शासन निर्णय क्र.१८.३.२०१० व शुध्दीपत्रक दि.५.६.२०१० च्या अनुषंगाने कृषि विद्यापीठातील शिक्षकवर्गीय कर्मचाऱ्यांची करण्यात आलेल्या वेतन निश्चितीबाबत

डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
अर्थ प्रशासन विभाग
पी.ओ. कृषि नगर, अकोला -४४४ १०४ (महाराष्ट्र)

**महत्वाचे / तात्काळ**

जा.क्र.अप्रवि/वि.नि./ 832 /२०१९ दिनांक:२५/०२/२०१९ २६

**वाचा :** १) शासन पत्र क्रमांक: पंदेवि १५१९/प्र.क्र.३४/६-अे, दि.२५ फेब्रुवारी,२०१९.

## परिपत्रक

कृषि विद्यापीठातील शिक्षकवर्गीय पदांच्या वेतननिश्चिती संदर्भात दि.२५/०२/२०१९ रोजी उचित कार्यवाहीस्तव शासनाकडून पत्र प्राप्त झाले आहे.

त्या अनुषंगाने विद्यापीठातील सबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांनी उपरोक्त सबंधी तात्काळ कार्यवाही करावी.

नियंत्रक
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला

**सोबत :** शासन पत्र दि.२५/०२/२०१९.

प्रत :१) सर्व विभागप्रमुख/आहरण व संवितरण अधिकारी, डॉ.पं दे.कृ.वि., अकोला / नागपूर.

२) मा.कुलगुरु महोदय यांचे स्वीय सहायक, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला यांना मा.कुलगुरु महोदय यांचे माहितीस्तव.

३) कुलसचिव, डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला यांना माहितीस्तव.

४) प्रभारी अधिकारी, संगणक प्रणाली कक्ष, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला यांना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसारणाकरीता.

नियंत्रक

Scanned by CamScanner

महाराष्ट्र शासन

क्रमांक : पंदेवि १५१९/प्र.क्र.३४/६-अे,
(संगणक क्रमांक : ४३५४४५)
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व
मत्स्यव्यवसाय विभाग, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई :३२
दिनांक : २५ फेब्रुवारी, २०१९.

प्रति,

नियंत्रक,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला,

विषय : या विभागाचा शासन निर्णय क्र. १८.३.२०१० व शुध्दीपत्रक दि.५.६.२०१० च्या अनुषंगाने कृषि विद्यापीठातील शिक्षकवर्गीय कर्मचा-यांची करण्यात आलेल्या वेतन निश्चितीबाबत..

संदर्भ : १) आपले पत्र क्र.अप्रवि/अंदाज/ ३९३/२०१९, दि.२१.२.२०१९.
२) या विभागाचा इंग्रजी शासन निर्णय क्र.अेयुजी ११०९/सीआर २५२/६-अे, दि.१८.३.२०१०.
३) या विभागाचा इंग्रजी शासन शुध्दीपत्रक क्र.अेयुजी ११०९/सीआर २५२/६-अे, दि.५.६.२०१०.
४) या विभागाचे इंग्रजी शासन शुध्दीपत्रक क्र.अेयुजी ११०९/सीआर २५२/६-अे, दि.२०.९.२०१०.
५) या विभागाचा शासन निर्णय क्र.संकीर्ण १५१७/प्र.क्र.४९७/६-अे, दि.२४.८.२०१८.

महोदया,

उपरोक्त विषयावरील आपल्या संदर्भाधीन क्र.(१) येथील दि.२१.२.२०१९ च्या पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, राज्यातील कृषि विद्यापीठांमधील शिक्षकवर्गीय कर्मचा-यांसाठी सहाव्या वेतन आयोगानुसार नवीन सुधारीत वेतन संरचना या विभागाचे संदर्भाधीन क्र. (२) येथील दि.१८.३.२०१० च्या शासन निर्णयान्वये लागू करण्यात आलेली आहे. तद्नंतर, या विभागाचे संदर्भाधीन क्र.(३) येथील दि.५.६.२०१० च्या शासन शुध्दीपत्रकाद्वारे काही संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये काही बदल करण्यात आलेले आहेत. त्यानंतरही या विभागाचे संदर्भाधीन क्र.(४) येथील दि.२०.९.२०१० च्या शुध्दीपत्रकान्वये संदर्भाधीन क्र.(३) येथील दि.५.६.२०१० चे शुध्दीपत्रक रद्द करण्यात येऊन काही संवर्गाच्या वेतनश्रेणीमध्ये पुन्हा काही बदल करण्यात आले आहेत.

२. या विभागाचे संदर्भाधीन क्र.(५) येथील दि.२४ ऑगस्ट, २०१८ च्या शासन निर्णयान्वये या विभागाचा संदर्भाधीन क्र.(४) येथील दि.२०.९.२०१० चे शुध्दीपत्रक रद्द करण्यात आले आणि या शासन निर्णयामध्ये या विभागाचे संदर्भाधीन क्र.(३) येथील दि.५.६.२०१० चे शुध्दीपत्रक पुनर्ज्जिवीत होत असल्याबाबतचा उल्लेख नसल्यामुळे दि.५.६.२०१० चे शुध्दीपत्रक सध्या अस्तित्वात नाही. या शिवाय, या विभागाचा संदर्भाधीन क्र.(५) येथील दि.२४.८.२०१८ च्या शासन निर्णयान्वये या विभागाचा संदर्भाधीन क्र.(४) येथील दि.२०.९.२०१० चे शुध्दीपत्रक पूर्वलक्षी प्रभावाने रद्द केल्यामुळे दि.२०.९.२०१० चे शुध्दीपत्रकही सध्या अस्तित्वात नाही. त्यामुळे राज्यातील कृषि विद्यापीठांमधील शिक्षकवर्गीय कर्मचा-यांच्या वेतन निश्चितीबाबतची कार्यवाही या विभागाच्या संदर्भाधीन क्र.(१) येथील दि.१८.३.२०१० च्या शासन निर्णयामधील तरतुदीनुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

Scanned by CamScanner

३. उपरोक्त पार्श्वभूमिवर या विभागाच्या संदर्भाधीन क्र.(२) येथील दि.१८ मार्च, २०१० च्या शासन निर्णयामधील परिच्छेद क्र.२(२)(अ) मधील खंड (नऊ) च्या तरतुदीनुसार, दि.१.१.२००६ रोजी कार्यरत असलेल्या सहयोगी प्राध्यापक व सहायक प्राध्यापक (निवडश्रेणी) यांना त्या पदावर ३ वर्षे पूर्ण होत असल्यास त्यांना रु.३७४००-६७०००+ग्रे.पे रु.९००० ही वेतनश्रेणी अनुज्ञेय ठरविण्यात आलेली आहे. तसेच, या शासन निर्णयामधील परिच्छेद क्र.२ (२)(अ) च्या खंड (दहा) मधील तरतुदीनुसार, दि.१.१.२००६ रोजी कार्यरत सहयोगी प्राध्यापक व सहायक प्राध्यापक (निवडश्रेणी) यांना त्या पदावर ३ वर्षे पूर्ण होत नसल्यास, ३ वर्षे पूर्ण होईपर्यंत रु.१५६००-३९१००+ग्रेड पे रु.८००० ही सुधारित वेतनश्रेणी अनुज्ञेय ठरविण्यात आलेली आहे आणि ३ वर्षे पूर्ण झाल्यानंतर रु.३७४००-६७०००+ ग्रेड पे.रु.९००० ही वेतनश्रेणी अनुज्ञेय ठरते आणि त्यानुसार वेतननिश्चिती करावयाची आहे.

४. आपल्या संदर्भाधीन क्र.(१) येथील दि.२१.२.२०१९ च्या पत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे, दि.१.१.२००६ रोजी कार्यरत असलेल्या सहयोगी प्राध्यापक व सहायक प्राध्यापक (निवडश्रेणी) यांना त्या पदावर ३ वर्षे पूर्ण झालेली नसतांनासुध्दा रु.३७४००-६७०००+ग्रे.पे रु.९००० या वेतनश्रेणीमध्ये वेतननिश्चिती करुन त्यापुढील वित्तीय फायदे अनुज्ञेय ठरविण्याची बाब ही या विभागाच्या संदर्भाधीन क्र.(२) येथील दि.१८ मार्च, २०१० च्या शासन निर्णयामधील परिच्छेद क्र.२(२)(अ) च्या खंड (दहा) मधील तरतुदींशी विसंगत आहे आणि त्यामुळे अशी कार्यवाही ही चुकीची ठरते.

५. म्हणून आपल्या संदर्भाधीन क्र.(१) येथील दि.२१.२.२०१९ च्या पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, या विभागाच्या दि.१८ मार्च, २०१० च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.२(२)(अ) च्या खंड (दहा) मधील तरतुदीनुसार दि.१.१.२००६ रोजी कार्यरत असलेल्या आणि त्या पदावर ३ वर्षे पूर्ण न करणा-या सहयोगी प्राध्यापक व सहायक प्राध्यापक (निवडश्रेणी) यांना प्रथम रु.१५६००-३९१००+ ग्रेड पे रु. ८००० ही वेतनश्रेणी ३ वर्षे पूर्ण होईपर्यंत अनुज्ञेय ठरविणे आवश्यक आहे आणि ३ वर्षाचा कालावधी संपल्यानंतर त्यांना रु.३७४००-६७०००+ग्रे.पे रु.९००० या वेतनश्रेणीमध्ये वेतननिश्चिती करणे आवश्यक आहे; कोणत्याही परिस्थितीत दि.१.१.२००६ रोजी कार्यरत असलेल्या आणि त्या पदावर ३ वर्षाचा कालावधी पूर्ण न केलेल्या सहयोगी प्राध्यापक व सहायक प्राध्यापक (निवडश्रेणी) यांना रु.३७४००-६७०००+ग्रे.पे रु.९००० ही वेतनश्रेणी अनुज्ञेय ठरत नाही.

६. त्यामुळे आपल्या संदर्भ क्र.(१) येथील दि.२१.२.२०१९ च्या पत्रामधील आपली धारणा पक्की करण्यात येत आहे.

७. तरी या प्रकरणी नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

आपला,

(दे.आ.गावडे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत, माहितीस्तव उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित :-

१) सदस्य सचिव, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे.
२) कुलगुरु/कुलसचिव, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.
३) कुलगुरु/कुलसचिव/नियंत्रक, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
४) कुलगुरु/कुलसचिव/नियंत्रक, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.
५) कुलगुरु/कुलसचिव/नियंत्रक, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी.
६) निवडनस्ती/कार्यासन ६-ओ.

Scanned by CamScanner